**नियमित दिवाणी दावा क्र.१५/२०१९**

**निशाणी क्र.५९ वरील आदेश**

( पारित दि.१२/१२/२०२३)

०१. वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.०४ श्रीमती मालती मधुकर दांडेकर यांचे वारस अभिलेखावर घेवून प्रस्तुत दाव्यातील सरनाम्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. ४ श्रीमती मालती मधुकर दांडेकर या दि. २३/०२/२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना एक मुलगा आणि तीन मुली असे कायदेशीर वारस आहेत. मयत प्रतिवादी क्र.४ चे कायदेशीर वारसांना प्रतिवादीपणात सामिल करुन घेण्याची परवानगी वादीने मागितली आहे.

०२. प्रतिवादीने वादीच्या अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदवली आहे.

०३ दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जास प्रतिज्ञापत्राद्वारे आधार दिला जातो. अर्जाच्या पृष्ठयर्थ अर्जदार गजेंद्र पटेल याने प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. मृत्युच्या दाखल्याची प्रत नि.क्र. ५२ लगत दाखल केलेली आहे. त्याप्रमाणे, प्रतिवादी क्र. ४ श्रीमती मालती मधुकर दांडेकर या दि. २३/०२/२०१९ रोजी मयत झाल्याचे अभिलेखावर दिसून येते. वास्तविक ९० दिवसांच्या आत अर्ज दाखल करावा लागतो. निश्चितच अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. परंतु सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबत असल्याने दाव्याचा निकाल गुणदोषावर होणे आवश्यक आहे. तसेच सदरची दुरुस्ती तांत्रीक स्वरुपाची असून दाव्यात कोणताही बदल होणार नाही. म्हणून मयत प्रतिवादी क्र.४ च्या वारसांना

प्रतिवादीपणात सामिल करुन घेणे आवश्यक आहे. सबब खालीलप्रमाणे मी आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज नि. क्र. ५९ मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादीला प्रतिवादी क्र.४ चे कायदेशीर वारस नोंदवण्याची परवानगी आहे.

०३. वादीने प्रस्तुत दाव्यात विनाविलंब दुरुस्ती करावी आणि दुरुस्ती दाव्याची प्रत दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

सही/-

**ठिकाणः पाली** **(मिना वामन जाधव)**

**दिनांक : १२/१२/२०२३** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाली.**